**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२८/८/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.८ शनिवार दि. ०१/९/२०१२ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**शनिवार दिनांक- ०१/९/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४० | अहमदनगर महानगरपालिके मार्फत मा. गट विकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती नगर यांचे अखत्यारीतील टंचाईग्रस्त गावांना मनपामार्फत त्यांचे टँकरद्वारे पुरवठा केलेल्या पाण्याच्या, बिलाच्या,थकबाकी वरील व्याज/ विलंब आकर निर्लेखित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ४१ | अहमदनगर महानगरपालिकेचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि.यांची केलेली नेमणूक करारनाम्यासह रद्द करणेत आलेबाबत त्यांना कळविणेस व या योजने करिता नविन PMC म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांची नेमणूक करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४२ | अहमदनगर महानगरपालिकेचे नगर-मनमाड रोड वरील जकात नाक्याकरिता सावेडी सर्व्हे नं. २५०/१अ + २५०/१ब ही श्री. विलासराव बलभिमराव जगताप यांची खुली जागा दरमहा रूपये १,५०,०००/- प्रमाणे अकरा महिन्याकरिता भाडे कराराने घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- विषय क्रमांक- ४० ते ४२ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८

विषय क्रमांक -४०  शनिवार दिनांक १/९/२०१२

ठराव क्रमांक - ४०  शनिवार दिनांक १/९/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिके मार्फत मा. गट विकास अधिकारी (उ.श्रे.) , पंचायत समिती, नगर यांचे अखत्यारीतील टंचाईग्रस्त गावांना मनपामार्फत त्यांचे टँकरद्वारे पुरवठा केलेल्या पाण्याच्या, बिलाच्या, थकबाकी वरील व्याज/ विलंब आकर निर्लेखित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. शहर पाणी पुरवठा विभाग जा.क्र. ३१४ दि.४/६/२०१२

प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिकेमार्फत पंचायत समिती नगर यांना त्यांचे टँकरद्वारे पुरवठा केलेल्या पाण्याच्या, बिलाच्या , थकबाकी वरील व्याज / विलंब आकर निर्लेखित करणेबाबत.

संदर्भ :- १. पंचायत समिती, नगर यांचे दि. २५/४/२०११ चे पत्र.

२. पंचायत समिती, नगर यांचे दि. १६/५/२०११ चे पत्र.

**टिप्पणी-** मा. गट विकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती, नगर यांचे अखत्यारीतील टंचाई ग्रस्त गावांना अहमदनगर महानगरपालिके मार्फत त्यांचे टँकरद्वारे सन १९९९ पासून पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. व त्यांना दरमहाचे पाण्याचे बिल देण्यांत येत आहे. परंतु सदर पाणी बीलाचा पंचायत समिती, नगर यांनी दरमहा भरणा न केल्याने व महानगरपालिकेच्या पाणी पुरवठयाचे दराचा विचार न करता महानगरपालिकेचे वसंत टेकडी व विळद या दोन्ही पाणी पुरवठा केंद्राचे एकतर्फी अधिग्रहण करून महानगरपालिकेचा दर प्रति १००० लिटरला रू.२५/- ऐवजी एकतर्फी अधिग्रहण नियमानुसार रू.६.६६ प्रमाणे पाणी बीलाचा भरणा केलेला आहे.त्यामुळे वरील दोन्ही दरात तफावत झाल्याने महानगरपालिकेची थकबाकी सातत्याने वाढत जावून थकबाकीवर दरमहा १.५ % व्याजाची आकारणी झाल्याने थकबाकीत वाढ झालेली दिसून येत आहे. तसेच सन २०११ डिसेंबर अखेर रक्कम **रू.७,८३,१८,१०६/-** इतकी थकीत आहे.

मा. शासनाचे शासन परिपत्रक क्र. टंचाई-२४०६/प्र.क्र. १४२ /पापु-१४ , मंत्रालय, मुंबई यांचे आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रात घरगुती वापरासाठी मीटर पध्दतीने १००० लिटरसाठी ज्या दराने पाणी पुरवठा करतात तो दर आधारभूत मानून १००० लिटरसाठी रू.१०/- या प्रमाणे टँकर करीता दर आकारणी करणेस मा. शासनाने ऑगस्ट २००६ मध्ये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार टँकरचे पाण्याचा दर प्रती १००० लिटर रू.२५/- ऐवजी रू.१०/- आकारून सुध्दा पंचायत समिती, नगर यांनी थकबाकी भरलेली नाही. त्यामुळे विलंब आकारात वाढ होवून थकबाकी वाढत गेली.

परंतु पंचायत समिती, नगर यांचे स्थानिक निधी लेखा परिक्षण सन २००८-२००९ मध्ये परिच्छेद क्र.२३ व २८ घेण्यांत आलेले असून महानगरपालिका नियमानुसार थकबाकी वरील द.सा.द.शे.१८% दराने आकारलेले व्याज व विलंब प्रदान करण्याची जिल्हा परिषद अधिनियमात तरतूद नाही. त्यामुळे सदरची रक्कम क्षमापित करावी असे महानगरपालिकेस कळविलेले आहे.

प्राप्त परिस्थितीत अभिलेखानुसार डिसेंबर २०११ अखेर रक्कम रू.७,८३,१८,१०६/- इतक्या थकीत रकमेपैकी मुळ रक्कम **रू. ३,८२,५९,६४१/-** इतकी असून व्याज व विलंब आकार रू. ४,००,५८,४६५/- इतका आहे. पंचायत समिती, अहमदनगर यांनी मुळ बील रक्कमे पैकी **रू.३,८२,३९,६७१/-** चा भरणा केलेला आहे. मुळ बीलातून भरणा केलेली रक्कम वजा जाता त्यांचेकडे निव्वळ पाणी बील रक्कम रू.१९,९७०/- थकीत आहे. तसेच व्याज / विलंब आकारापोटी रक्कम **रू.४,००,५८,४६५/-** इतकी थकीत आहे.

पंचायत समिती, नगर यांनी विलंब आकार माफ करणे विषयी कळविले असता त्यांचे प्रस्तावाचा अभ्यास करता त्यांची मागणी मान्य केल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. तरी संबंधीताना व्याज व विलंब आकारासह थकबाकीचे बील देणे योग्य राहिल. असा रिपोर्ट पाणी पुरवठा विभागामार्फत सादर केला असता मा.आयुक्त यांनी विधी सल्लागार यांचे मत घ्यावे असे सांगितले. त्यानुसार इकडील जा.क्र. ११३६ दि.२४/११/२०११ अन्वये महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांना पत्र दिले असता त्यांचेकडे प्राप्त अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

"मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे थकबाकीवरील व्याज वसूल करण्याची तरतूद नाही. विलंब आकारही आकारावा किंवा नाही, आकारावयाचा असल्यास किती घ्यावा ? याबाबत मा.आयुक्तांनाच अधिकार आहे. महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती पुढे विषय ठेवून व्याज / विलंब आकार क्षमापीत करता येईल. अशा परिस्थितीत मा.आयुक्तांनी मा.स्थायी समिती पुढे विषय ठेवून योग्य तो निर्णय घेणे उचित राहिल.(सोबत अभिप्रायाचे पत्र)

असा अभिप्राय दिलेला असून त्यानुसार मा.उपायुक्त (सा.) व मा. आयुक्त यांनी सदर अभिप्रायानुसार विषयांकित बाबत मा.स्थायी समिती पुढे ठेवून निर्णय घेणे उचित राहील असे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मनपा मार्फत गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती नगर यांचे अखत्यारितील गावांना करण्यांत आलेल्या पाणी पुरवठयाचे बिला वरील व्याज दंड माफ करणे बाबतचा विषय आहे. परंतु मुळानगर पंपिंग स्टेशन पासुन पाणी उपसा करुन वसंत टेकडी पर्यंत पाणी आणणे कामी होणारा खर्च कोण करणार. सदर पाण्यापोटी महानगरपालिकेकडे विद्युत वितरण कंपनीची किती थकबाकी आहे.

मॅके.इंजि..श्री.निकम पी.जे.:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील काही थकबाकी महानगरपालिकेकडे लागू झालेली आहे. त्यामुळे थकीत पाणी वीजबिलाचा आकडा वाढलेला आहे.

मा.सभापती साहेब :- पाणी उपसा करुन वसंत टेकडी पर्यंत पाणी आणणेकामी वापरण्यांत आलेल्या वीजेचे बिल महावितरण कंपनीकडुन माफ केले जाईल काय? संबंधितांचा पाणी बिलावरील दंड व्याज माफ करणे बाबतचा प्रस्ताव सादर करतांना विद्युत वितरण कंपनीकडुन महानगरपालिकेस व्याजात सूट मिळेल काय, याबाबत विचार केला का ? व्याज माफी बाबत महानगरपालिकेचे काही नियम उपविधी आहेत का ?

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे. :- ग्रामीण भागातील गावांना पाणीपुरवठा करणेकरीता पंचायत समिती मार्फत वसंत टेकडी येथुन भरुन दिलेल्या पाण्याच्या टँकर्सचे बिलावरील दंड व्याज माफ करणे बाबत नियम उपविधी नाहीत.

मा.सभापती साहेब :- संबंधितांचे व्याज माफ करणे बाबत मनपा विधी तज्ञांचा सल्ला घेतला काय त्यांचे मत काय आहे.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:- संबंधितांना व्याज व विलंबाचे आकारासहीत वसुली बाबत इकडील जा.क्र.११३६ दिनांक २४/११/२०११ अन्वये मनपाचे विधी सल्लागार यांना पत्र दिले होते. त्यानुसार त्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे थकबाकीवरील व्याज वसुल करण्याची तरतुद नाही. विलंब आकार हा आकारावा किंवा नाही आकारावयाचा असल्यास किती आकारावा याबाबत मा.आयुक्तांना अधिकार आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १५२ नुसार मा.स्थायी समितीपुढे विषय ठेवुन व्याज विलंब आकार क्षमापित करता येईलअशा परिस्थितीत मा.आयुक्तांनी सदरचा विषय मा.स्थायी समितीपुढे ठेउन योग्य तो निर्णय घेणे उचित राहिल असा अभिप्राय दिलेला आहे.

मा.सभापती साहेब :- सदर पाणी बिलावरील व्याज विलंब आकार माफ करणे बाबत मा.आयुक्तांनी त्यांचे काय मत दिले आहे.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:- पाणीपुरवठा विभागा मार्फत सादर करण्यांत आलेल्या प्रस्तावावर त्यांनी सदरचा विषय हा मा.स्थायी समितीपुढे ठेवा. अशा बाबत अभिप्राय दिलेला आहे.

मा.सभापती साहेब :- ग्रामीण भागाला पंचायत समिती मार्फत पाणीपुरवठा करणे कामी काही नियम उपविधी ठरलेले आहेत काय ? पाणी पुरवठा करतांना कोणाची मंजूरी घेतली होती.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:- ग्रामीण भागात दुष्काळी परिस्थिती असतांना मा.जिल्हाधिकारी साो यांनी वसंतटेकडी येथील पाण्याचा जलकुंभ त्यांचे अधिकारात अधिग्रहीत केलेला होता. त्यानुसार त्यांनी सदर ठिकाणावरुन टँकर भरुन त्यांनी पाणीपुरवठा केलेला आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना.:- आजपर्यंत पंचायत समिती मार्फत करण्यांत आलेल्या टँकर पाणीपुरवठयाचे बिल किती आहे.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:- प्राप्त परिस्थितीत अभिलेखानुसार डिसेंबर २००० अखेर ७ कोटी ८३ लाख १८ हजार १०६ इतक्या थकीत रक्कमेपैकी मुळ रक्कम ३,८२,५९,६४१/- इतकी असुन व्याज व विलंब आकार रु. ४,००,५८,४६५/- इतका आहे. पंचायत समिती अहमदनगर यांनी मुळ बिला पैकी ३,८२,३९,६७१/- रकमेचा भरणा केलेला आहे.

मा.श्री. कवडे उ. खं. :- विलंब व व्याज आकारणीत माफी देण्यांत येउ नये.

मा सौ. गंधे सु.मो.:- मुळा डॅम पंपीग स्टेशन पाणी उपसा करून वसंत टेकडी पर्यत पाणी आणणे कामी झालेल्या वीज बिलावरील विलंब / व्याज आकारात मनपास विद्युत वितरण कंपनी कडून माफी मिळत नाही. त्यामुळे सद्यस्थितीत पंचायत समिती यांना विलंब व व्याज आकारणीत माफी देण्यांत येउ नये.

मा.सभापती साहेब :- सभेत झालेल्या चर्चाचा विचार करता पंचायत समिती यांचेकडे रूपये ४ कोटी रकमेपेक्षा अधिक रक्कम थकीत आहे. महानगरपालिकेच्या कायदयातील तरतूदी व विधी तज्ञांनी दिलेल्या मतांचा सारासार विचार घेता ही बाब महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी निगडीत असल्याने तसेच महानगरपालिकेस वीज बीलापोटी येणार खर्च विचारात घेता व्याज / विलंब आकार निर्लेखित करण्यांत येवु नये.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट पहाता अहमदनगर महानगरपालिके मार्फत मा.गट विकास अधिकारी (उ.श्रे.),पंचायत समिती, नगर यांचे अखत्यारीतील टंचाईग्रस्त गावांना मनपामार्फत त्यांचे टँकरद्वारे पुरवठा केलेल्या पाण्याच्या, बिलाच्या, थकबाकी वरील व्याज/ विलंब आकर निर्लेखित करणेबाबत सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

मुळा पंपींग स्टेशन ते वसंत टेकडीपर्यंत पाणी आणण्याकामी महानगरपालिकेस वीज बीलांचा मोठया प्रमाणात खर्च येतो. याबाबत महानगरपालिकेस कुठलीही सवलत मा.शासन देत नाही. तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी ही बाब निगडीत असल्याने होणारे आर्थिक नुकसान विचारात घेता अहमदनगर महानगरपालिकेमार्फत मा.गट विकास अधिकारी (उ.श्रे.) , पंचायत समिती,नगर यांचे अखत्यारीतील टंचाई ग्रस्त गावांना मनपामार्फत त्यांच्या टॅन्करद्वारे पुरवठा केलेल्या पाण्याच्या बिलाच्या थकबाकीवरील व्याज / विलंब आकार निर्लेखित करणेत येउ नये.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ४१ शनिवार दिनांक १/९/२०१२

ठराव क्रमांक - ४१ शनिवार दिनांक १/९/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांची केलेली नेमणूक करारनाम्यासह रद्द करणेत आलेबाबत त्यांना कळविणेस व या योजने करिता नविन PMC म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांची नेमणूक करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. पाणी पुरवठा विभाग दि.१०/०८/२०१२

विषय- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२
मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांचे PMC सेवा रद्द करणे व नविन PMC पोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा) यांची नेमणूक होणेबाबत.

संदर्भ :- १] मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांचेशी दि.१२/११/२००९ रोजीचा करारनामा
२] पा.पु. जा.क्र. ९९९ दि.२६/११/२००९ अन्वये कार्यारंभ आदेश
३] PMC यांचे जा.क्र. १३२ दि.१९/०७/२०१२ चे पत्र
४] म.जी.प्रा. चे जा.क्र. ७७० दि.२७/०७/२०१२ चे पत्र
५] इकडील जा.क्र. ५८० दि.३०/०७/२०१२ चे पत्र
६] म.जी. प्रा. चे जा.क्र. ८०४ दि.०३/०८/२०१२ चे पत्र

मा. फेर सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेमार्फत UIDSSMT योजने अंतर्गत राबविणेत येत असलेल्या अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ या योजनेसाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार ' म्हणून मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांची संदर्भ क्र. १ अन्वये करारनामा झालेला असून संदर्भ क्र.२ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेले होते. परंतू मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांची सेवा असमाधानकारक व मनपा च्या आर्थिक हितास बाधा आणणारी असल्यामुळे त्यांची सेवा रद्द करणे बाबतचा प्रस्ताव या विभागामार्फत सादर करण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांची दि. ९/०८/२०१२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली असून कार्यादेशाप्रमाणे PMC ला नेमून दिलेले काम, त्यानुसार त्यांनी केलेले काम व त्यांना केलेल्या कामापोटी दिलेली रक्कम याबाबतचा स्वंतत्र अहवाल तसेच याकामी नविन PMC नेमणेबाबतचा प्रस्ताव त्वरीत सादर करणेबाबत निर्देशित केलेले असल्यामुळे वरील बाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

**मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांना नेमून दिलेले काम, त्यानुसार त्यांनी केलेले काम व त्यांना केलेल्या कामापोटी दिलेली रक्कम याबाबतचा स्वंतत्र अहवाल**

संदर्भ पत्र क्र.१ अन्वये झालेल्या करारनाम्यानुसार मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांनी खालीलप्रमाणे कामे करणे अपेक्षित होते.

| अ.नं. | नेमून दिलेल्या कामाचा तपशिल | काम केले किंवा नाही | शेरा |
|---|---|---|---|
| १ | वर्कींग सर्व्हे, हायड्रोलिक डिझाइन, वर्कींग प्लॅन्स् व अंदाजपत्रक तयार करणे | नाही | सदरची बाब योजनेचे प्रत्यक्ष काम सुरू करणेपुर्वीच होणे आवश्यक होते. अद्याप पावेतो सर्व्हेक्षण पूर्ण झालेले नाही. |
| २ | निविदा विषयक सर्व कागदपत्रे तयार करून प्रमाणित करून देणे | केले | केलेल्या कामांचे देयक अदा केलेले आहे. |
| ३ | प्राप्त झालेल्या निविदांची तांत्रिक व आर्थिक छाननी करून योग्य त्या अभिप्रायासह म.न.पा.स सादर करणे | केले | सदर बाबत चुकीच्या पध्दतीची आर्थिक व तांत्रिक तपासणी करून म.न.पा.च्या आर्थिक हितास बाधा आणणारे मुल्यांकन केलेले आहे. |
| ४ | कामाचा बारचार्ट सादर करून वेळोवेळी अद्यावत ठेवणे | नाही | PMC ने बारचार्ट सादर केलेला नाही तसेच ठेकेदाराने सादर केलेल्या बारचार्ट नुसार काम सुरू आहे किंवा नाही याबाबत देखील म.न.पा.स अवगत केलेले नाही. |
| ५ | रस्ता, रेल्वे क्रॉसींग बाबत प्रस्ताव तयार करून संबंधीत विभागाशी पाठपुरवा करून मंजुरी प्राप्त करून घेणे | केले | प्रस्ताव तयार करून संबंधीत विभागास सादर केलेले आहे. परंतु त्याबाबतचा पाठपुरावा केलेला नाही. |
| ६ | चालू असलेल्या कामाचे काम संपेपर्यत सुपरवीझन करणे. | आहे | योजनेचे विस्तृत स्वरूप पाहता आवश्यक असलेला तांत्रिक स्टाफ नसल्यामुळे योग्य प्रकारे सुपरवीझन होत नसून कामास विलंब झालेला आहे. |
| अ | पाईप लाईनचे लाईन आउट मंजूर, ड्रांइग व डिझाडननुसार तपासणे | केले | --- |
| ब | जमिनीचा पृष्ठभाग तपासून त्याची Safe bearing capacity ठरविणे | केले | --- |
| क | IS Codes व Standard Practice नुसार पाईप्स अथंरणे, जोडणेच्या, हायड्रोलिक टेस्टींगच्या कामाचे सुपरवीझन करणे | केले | अपु-या तांत्रिक स्टाफमुळे योग्य प्रकारे सुपरवीझन झालेले नाही. |
| ड | थर्ड पार्टी इन्स्पेक्शन साठी उपस्थित राहणे | केले | सोईनुसार उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| इ | सिमेंट, खडी, वाळू, स्टील, क्यूब, व आर.सी.सी. स्ट्रक्चरचे हायड्रोलिक टेस्टींग इत्यादी बाबींची समक्षात तपासणी करणे. | नाही | कामाच्या सुरूवातीस सिमेंट, खडी, वाळू ,स्टील यांची योग्य ती तपासणी केली नाही. म.न.पा. ने चुक लक्षात आणून दिल्यानंतर शिफारस केल्या. |
| फ | स्टील, सेन्टरींग व इतर आर.सी.सी. कामांची तांत्रिक तपासणी करणे | केले | वेळेत केलेले नाही. |
| ग | म.न.पा. कडून इतर निर्देशित केलेले काम करणे | -- | |
| ७ | भु- संपादन, शेतीचे नुकसान भरपाई, विद्युत केबल्स इत्यादी बाबींचे प्रस्ताव तयार करणे | नाही | विळद ते नागापूर दरम्यानच्या उर्ध्ववाहिनीच्या कामास शेतक-यांचा विरोध असून त्याबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही. |
| ८ | ठेकेदारामार्फत झालेल्या दैंनदिन कामाचे सुपरवीझन करून मोजमापे घेणे व मोजमाप पुस्तकात नोंदी करून बीले तयार करणे | केले | दैंनदिन कामांच्या मोजमापांची नोंदी विहीत नमुन्यात घेण्यात आलेली नव्हती. |
| ९ | साहित्य पुरवठा विविध साहित्यांची तपासणी रजिस्टर्स, म.न.पा. ने पुरविलेल्या अथवा ठेकेदाराने पुरविलेल्या साहित्यांचे स्टॉक रजिस्टर अद्यावत ठेवणे | नाही | याबाबत PMC कडून फक्त स्टॉक रजिस्टर अद्यावत ठेवण्यात आलेले आहे. |
| १० | ठेकेदाराने सादर केलेल्या देयकाची तांत्रिक तपासणी करून म.न.पा.स सादर करणे | केले | |
| ११ | ठेकेदाराने केलेल्या दाव्याबाबत मार्गदर्शन करणे | नाही | ठेकेदाराकडून मागणी झालेली डी.वॉटरींग, EIRL, टाकीचे फौंडेशन इत्यादी बाबत अद्याप काहीही मार्गदर्शन मिळालेले नाही. |
| १२ | ठेकेदारा समवेत साईटवर मासिक आढावा बैठक आयोजित करणे व तसेच आर्थिक व भौतिक अहवाल म.न.पा.स सादर करणे | नाही | अद्याप एकदाही आढावा बैठक आयोजित केलेले नसून नियमित आवश्यक असलेला कामाच्या आर्थिक व भौतिक प्रगती बाबत म.न.पा.स अहवाल सादर केलेला नाही. |
| १३ | अतिरिक्त बाबींच्या दरसुची (Extra Item Rate List), कलम ३८, भाव वाढ इत्यादी बाबींचे प्रस्ताव तयार करून म.न.पा.स व शासनास सादर करणे. | नाही | मुरूम बेडींग, एम.एम. स्पेशल्स इत्यादीचे EIRL सादर केलेला नाही. |
| १४ | ठेकेदाराने सादर केलेले भाववाढीचे देयक तपासून म.न.पा.स सादर करणे. | नाही | सदरची बाब कामाच्या निविदेत समाविष्ठ नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | आवश्यकता भासल्यास योजनेचे फेर अंदाजपत्रक तयार करून शासनास सादर करणे. | नाही | अद्याप पावेतो आवश्यकता भासलेली नाही. |
| १६ | मासिक, त्रैमासिक प्रगती अहवाल तसेच म.न.पा.स आवश्यक असलेल्या इतर माहिती तयार करणे, तसेच योजने बाबत शासनास आवश्यक असलेली माहिती Online सादर करणे. | नाही | PMC अद्याप एकदाही सदरच्या बाबीची अमंलबजावणी केलेली नाही. |
| १७ | रस्ता व रेल्वे क्रॉसींग, सार्व. बांधकाम विभाग, MSEDCLच्या मंजूरीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे/ चार्जेस बाबत मदत करणे | | म.न.पा.ने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे दिलेली आहेत.परंतू PMC मार्फतपाठपुरावा करण्यात आलेला नाही. |

मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार PMC कडून निविदा विषयक सर्व कागदपत्रे तयार करून प्रमाणित करून देणे या कामापोटी त्यांना रू.३८,७१,६५०/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच पुढील काम असमाधानकारक तसेच म.न.पा. च्या आर्थिक हितास बाधा आणणारे असल्यामुळे त्याचे पुढील देयक अदा केलेले नाही.तसेच करारानाम्यातील पृष्ठ क्र.८ वरील मुद्दा क्र.७ मधील नमूद नुसार PMC ने दि.०१/१०/२००९ रोजी पत्र देवून असे कळविले आहे की, PMC चे काम असमाधानकारक असल्यास त्या कामाचे देयक देखील अदा करण्यात येवू नये व मुद्दा क्र.७ नुसार सदरचे काम मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांचेकडून काढून घेणे बाबतचे अधिकार म.न.पा. ने राखून ठेवलेले आहे.

वरीलप्रमाणे नमूद केलेनुसार सर्व बाबींच्या व्यतिरिक्त मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांचेकडे ठेकेदाराकडून प्राप्त झालेले विविध प्रस्ताव, तांत्रिक छाननी व मंजूरीसाठी प्रलंबीत असून ते खालीलप्रमाणे आहेत.

१] मुरूम बेडींग, टाक्यांचे फौंडेशन इत्यादी बाबींचे EIRL

२] ठेकेदाराच्या देयकातून कपात केलेल्या रक्कमा परत करणे विषयीचे अभिप्राय

३] Zero velocity valve, Air cushion valve च्या तांत्रिक मंजूरीचे प्रस्ताव

४] वितरण व्यवस्थेमधील स्लूस व्हॉलचे निश्चित ठिकाण

५] NDT च्या अहवालानुसार मुळाधरण येथील पंपहाउसच्या करावयाच्या दुरूस्तीच्या अंदाजपत्रकाच्या तपासणी बाबतचा प्रस्ताव

६] भिस्तबाग येथील उंच टाकीच्या स्ट्रक्चरल डिझाइनचा प्रस्ताव

७] विविध उंच टाक्यांच्या Scaffolding Design च्या तपासणी बाबतचा प्रस्ताव

८] वितरण व्यवस्थेचे पाईप्स अथंरणे, जोडणे, हायड्रोलिक टेस्टींग बाबतचा QAP

९] ठेकेदाराने सादर केलेल्या हायड्रोलिक डिझाइनसाठी आवश्यक असलेल्या Pressure gauge च्या कॅलिब्रेशन कागदपत्रांची छाननी

१०] EOT क्रेन

११] वसंत टेकडी येथे नविन पंपहाउस बांधणे बाबतचा अहवाल

१२] विळद नविन स्विच हाउस

१३] लोड लिस्ट व्हेरीफिकेशन

१४] रोड क्रॉसींगचे प्रस्ताव

१५] वितरण व्यवस्थेचे व गुरूत्ववाहिनीचे वर्कींग सव्हे व हायड्रोलिक डिझाडन

१६] योजनेच्या कामाचे अकरावे धावते देयक

वरील बाबींच्या अनुषंगाने मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांना खालीलप्रमाणे कळविणे योग्य वाटते.

१] वरील सर्व नमूद बाबींचे प्रस्ताव प्रलंबीत असून सदरच्या बाबींचे प्रस्ताव परत मागवून घेणे

२] मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांची PMC ची सेवा रद्द केले असल्याचे कळविणेस

**अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ साठी नविन PMC नेमणेबाबतचा प्रस्ताव त्वरीत सादर करणे बाबत.**

UIDSSMTयोजनेअंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२च्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवेच्या अनुषंगाने म.जि.प्रा. ची नेमणूक करणेबाबत मा.आयुक्त स्तरावर चर्चा झालेली असून त्यातच म.जी.प्रा.चे संदर्भिय पत्र.क्र.४इकडेस प्राप्त झाले असून मनपा मार्फत राबविण्यांत येत असलेल्या विविध योजनांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा उपलब्ध होणेबाबत विनंती केलेली असून त्याबाबतचे आकारण्यात येणारे सेवा शुल्क बाबत देखील इकडेस कळविलेले आहे. या अनुषंगाने अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ च्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा देणेबाबत इच्छुक आहात किंवा कसे ? म.न.पा. चे संदर्भिय पत्र क्र.५अन्वये म.जी.प्रा.स विचारणा करण्यात आली होती.

त्यानुसार कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. PMC सेवा विभाग, नाशिक यांचे संदर्भ पत्र क्र.६ इकडेस प्राप्त झाले असून विषयांकित योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सेवा देणेस इच्छुक असल्याचे तसेच PMC चार्जेस बाबत स्विकृत निविदेची किंमत रू. ७५.०० कोटी पेक्षा जास्त असल्यास २.७५% किंवा रू.२२५ लक्ष यापेक्षा जास्त असलेली रक्कम फि म्हणून म.जी.प्रा.कडे देय राहिल असे कळविले आहे. परंतु या योजनेच्या अनुषंगाने अपूर्ण अवस्थेत असलेली कामे अद्याप सुरू न केलेली कामे, निविदेची स्विकृत किंमत म.जी.प्रा. स कळविणे आवश्यक आहे.

नविन नेमण्यात येणा-या PMC ला खालीलप्रमाणे नमूद कामे करणे आवश्यक आहे.

१] मुरूम बेडींग, टाक्यांचे फौंडेशन इत्यादी बाबींचे EIRL

२] ठेकेदाराच्या देयकातून कपात केलेल्या रक्कमा परत करणे विषयीचे अभिप्राय

३] Zero velocity valve, Air cushion valve च्या तांत्रिक मंजूरीचे प्रस्ताव

४] वितरण व्यवस्थेमधील स्लूस व्हॉलचे निश्चित ठिकाण

५] NDT च्या अहवालानुसार मुळाधरण येथील पंपहाउसच्या करावयाच्या दुरूस्तीच्या अंदाजपत्रकाच्या तपासणी बाबतचा प्रस्ताव

६] भिस्तबाग येथील उंच टाकीच्या स्ट्रक्चरल डिझाइनचा प्रस्ताव

७] विविध उंच टाक्यांच्या Scaffolding Design च्या तपासणी बाबतचा प्रस्ताव

८] वितरण व्यवस्थेचे पाईप्स अथंरणे, जोडणे, हायड्रोलिक टेस्टींग बाबतचा QAP

९] ठेकेदाराने सादर केलेल्या हायड्रोलिक डिझाइनसाठी आवश्यक असलेल्या Pressure gauge च्या कॅलिब्रेशन कागदपत्रांची छाननी

१०] EOT क्रेन

११] वसंत टेकडी येथे नविन पंपहाउस बांधणे बाबतचा अहवाल

१२] विळद नविन स्विच हाउस

१३] लोड लिस्ट व्हेरीफिकेशन

१४] रोड क्रॉसींगचे प्रस्ताव तयार करून मंजूरी घेणे

१५] वितरण व्यवस्थेचे व गुरूत्ववाहिनीचे वर्कींग सव्हे व हायड्रोलिक डिझाइन तयार करणे.

१६] योजनेच्या कामाचे धावते देयकांची मोजमाप पुस्तकात नोंदी घेणे व देयके तयार करणे.

१७] योजनेतील कामांचे सुपरवीझन

१८] तसेच "प्रकल्प व्यवस्थापक" म्हणून करावयाची कामे व योजनेच्या अनुषंगाने महानगरपालिका सांगेल अशी कामे

मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT च्या मार्गदर्शक सुचनेनुसार विषयांकित योजनेचे काम विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरच्या योजनेसाठी PMC नेमणेबाबत निविदा प्रसिध्द करणे त्यानंतरची कार्यवाही करणेसाठी जास्त कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही शासनाचीच संस्था असून सदरच्या संस्थेस अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ या कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवेचे काम सुपूर्त करून त्याबाबतचा करारनामा करून घेणे योग्य राहिल.

विषयांकित योजनेसाठी यापूर्वी स्विकृत निविदेनुसार अंदाजे रू.२८.०० कोटी खर्च झालेला असून अंदाजे रू.८९.०० कोटीचे देयके अदा करणे बाकी आहे.

PMC सेवा देणेसाठी म.जी.प्रा. ची विषयांकित योजनेच्या PMC साठी नेमणूक झाल्यानंतर मा. शासन निर्णयानुसार योजनेच्या किंमतीच्या २.७५% इतकी रक्कम अदा करणे क्रमप्राप्त आहे. करिता उर्वरीत देयका पोटी द्यावयाच्या किंमतीच्या २.७५% इतकी रक्कम म.जी.प्रा. ला अदा करावी लागेल.

करिता अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ च्या कामापोटीची 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार ' पोटी केलेली नेमणूक करारनाम्यासह रद्द करण्यात आलेली असले बाबत मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांना कळविणेस तसेच या योजनेकरिता नवीन PMC म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग) यांची नेमणूक करणेकामी प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणे उचित वाटते.

तथापी मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

--**--

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांना नेमून दिलेले काम त्यांनी केलेले काम, न केलेली कामे त्यांना अदा करण्यात आलेली देयके याबाबत वरीलप्रमाणे सादर.

तसेच अ.नगर शहर सुधारित पा.पु. योजना टप्पा-२ या योजनेकरिता नवीन प्रकल्प व्यवस्थापन संस्थेची नेमणूक करणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या प्रकल्प व्यवस्थापन सेवा या विभागाची नेमणूक होणे योग्य वाटते. नेमणूक करणेबाबत वरील ऑफिस रिपोर्ट प्रमाणे अहवाल मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य वाटते. मंजुरीस्तव सादर.

यावर मु.ले.अ.यांचा अभिप्राय की,संपुर्ण प्रस्तावाचा विचार करता,"अ"प्रमाणे मंजूरीस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव "अ" प्रमाणे PMC मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांना सेवा रद्द केल्याचे कळविण्यास व सदरील योजनेसाठी PMC म्हणून M.J.P. ची नेमणूक करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे योग्य तथापि मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त सो. यांची अभिप्राय की, "अ" नुसार मान्य दि.१३/०८/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांची केलेली नेमणूक रद्द केलेली असून या योजने करिता नविन PMC म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांची नेमणूक करणेस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती सांगावी.

ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कोतकर सु.स. / मा.श्री. सातपुते दि.ना.:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी केडगांव विभागात काम करतांना कुठलेही काम योग्य प्रकारे केलेले नाही. तसेच सदर कामाकरीता यापुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची पीएमसी म्हणुन नेमणुक करण्यांत आलेली होती. त्यांचाही कामाबाबतचा अहवाल चांगल्या प्रकारे नाही. याकरीता सदर एजन्सीकडून व्यस्थित काम करून घेणे गरजेचे आहे.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे. :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचा त्यावेळचे कामाबाबत रिपोर्ट केलेला होता. सध्या मा.शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्ये पीएमसी नेमणुकी करीता स्वतंत्र विभाग तयार केलेला आहे. त्यांचे विभागामार्फत पीएमसी म्हणुन काम केल्यास चांगल्या प्रकारे होईल.

मा.सभापती साहेब :- सल्लागार मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांची पीएमसी म्हणुन सेवा रद्द केली का? अशा प्रकारचे त्यांना महानगरपालिके मार्फत पत्र दिले आहे काय ?

मॅके.इंजि. श्री.निकम पी.जे. :- मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि.यांची पीएमसी म्हणुन सेवा रद्द करणे बाबतचा प्रस्ताव मंजूर झालेला असुन त्यांना पत्र देणे बाकी आहे. त्यांना ताबडतोब पीएमसी सेवा रद्द केल्याबाबतचे पत्र देतो.

मा.सभापती साहेब :- मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. यांना आजपर्यंत किती रक्कमेची बिले अदा केलेली आहेत. त्यांनी किती काम केलेले आहे.

मॅके.इंजि. श्री.निकम पी.जे. :- पी.एम.सी. ने निविदा विषय काम केलेले असून त्यापोटी अंदाजे रू.३८ लाख रकमेचे बीला अदा केलेला आहे.

मा.सभापती साहेब :-या योजनेवर आज अखेर किती खर्च झाला किती रकमेचे काम शिल्लक आहे व नवीन पी.एम.सी. किती दराने नेमणार आहेत.

मॅके.इंजि. श्री.निकम पी.जे. :- या योजनेसाठी यापुर्वी स्विकृत निविदेनुसार अंदाजे रु.२८ कोटी खर्च झालेला असुन अंदाजे रु.८९ कोटीचे काम करणे बाकी आहे. पीएमसी म्हणुन मजिप्राची निवड झाल्यास शासन निर्णयानुसार योजनेच्या किमतीच्या २.७५ टक्के रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करावी लागेल.

मा.सभापती साहेब :- सदर पीएमसी नेमणुक करतांना आता २.७५ ने काम द्यावयाचे आहे.नविन एजन्सी नेमतांना सदर रक्कमेत २० टक्के कमी करणार का ब्रेकबनुसार टेंडर कामापोटी २०%, वर्कऑर्डर कामापोटी २०%,सुपरव्हीजन कामापोटी ५०% व काम पुर्णत्वाच्या दाखल दिल्यानंतर १०% याप्रमाणे रक्कम अदा करावी तसेच स्ट्रडकॉम यांनी केलेल्या कामा व्यतिरिक्त वर्कऑर्डर नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ते जे काम करतील त्याचेच बील देण्यांत यावे.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:- मा.शासनाने पी.एम.सी.करिता दर ठरविलेले आहेत त्यानुसार आपल्याला फी दयावी लागेल.

मा.सभापती साहेब :- सदरचा प्रस्ताव हा अपुर्ण सादर करण्यांत आलेला आहे. तरी पुर्ण प्रस्ताव तयार करुन मा.स्थायी समितीचे मंजूरी करिता सादर करणेत यावा.

मा.उपायुक्त (सा) डॉ.डोईफोडे साहेब :- अहमदनगर शहर पाणीपुरवठा योजना फेज- २ कामी नेमण्यांत आलेल्या मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि.यांची पीएमसी म्हणुन करण्यांत आलेली नियुक्ती रद्द करणे बाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आलेला आहे. संबंधितांना पीएमसी रद्द केल्याबाबतचे पत्र आज रोजी मनपा विधीतज्ञाचे मत घेवुन देण्यात येईल. शहर पाणीपुरवठा योजना फेज-२ चे काम चालू रहाणे आवश्यक आहे. त्याकरीता पुन्हा पी.एम.सी.ची नव्याने नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर कामावर आजपर्यंत अंदाजे २८कोटी खर्च झालेला आहे. यापुढील कामाची बिले पी.एम.सी.ला २.७५टक्केने दिली जाणार आहेत. सदर योजनेचे काम चालू ठेवणे आवश्यक आहे. आज सादर करण्यांत आलेला प्रस्ताव पुर्ण आहे. फक्त संबंधितांना पत्र देणे बाकी आहे. ते लवकरच दिले जाईल.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- शहर पाणीपुरवठा योजना फेज-२ चे काम किती पुर्ण झाले.

मॅके.इंजि. श्री.निकम पी.जे. :- एकुण योजनेच्या १५ टक्के काम झालेले आहे.

मा.उपायुक्त (सा)डॉ. डोईफोडे साहेब :- महानगरपालिकेकडे अभियंत्यांची कमतरता असल्यामुळे सदर योजनेचे काम झालेले नाही.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- मे.स्ट्रडकॉम कंन्सलटंट प्रा.लि. यांना महानगरपालिकेमधील पीएमसी म्हणुन सेवा रद्द केल्या बाबतचे पत्र दिल्यानंतर मजिप्राची सदर कामाकरीता पीएमसी म्हणुन नेमणुक करावी. आजचा विषय मंजूर करावा. सदरयोजनेचे काम पुर्ण होणेकामी वेळ कमी आहे. पुढील पीएमसी नेमतांना परिपुर्ण अटीशर्ती टाकुन करारनामा करुन घेण्यांत यावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- शहराच्या दृष्टीने भविष्यकाळ विचारात घेता ही योजना चांगले दर्जेदार कामे होणे गरजेचे आहे. या योजनेत भविष्यातील २०४० पर्यतचे लोकसंख्या विचारात घेवून तयार केलेली आहे. या योजनेचे काम कालबध्द मुदतीत होणे गरजेचे आहे कार्यालयीन प्रस्तावानुसार या कामावरिल पी.एम.सी. स्ट्रडकॉम यांचे बाबत करारनाम्यातील अटी व शर्ती विचारात घेवुन त्यांचे कडील कामकाज रद्द करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी तसेच सदरचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडे सोपविण्याचे दृष्टीने त्यांची नेमणुक करणेस सभेत झालेल्या चर्चेनुसार मंजुर घ्यावी.

**<u>ठराव:-</u>**ऑफिस रिपोर्ट व सभेत झालेल्या चर्चेनुसार ठरविण्यात येत की, अहमदनगर महानगरपालिकेचे अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ ही योजना मा. शासनाच्या अर्थ सहाय्याअन्वये सुरू असुन या योजनेचे कालबध्द स्वरूप व नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याचे दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाची व आवश्यक अशी योजना आहे.

या योजनेचे कामातील येणा-या अडचणी दुर करून काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे यास्तव प्रशासनाने दिलेला तपशिलवार ऑफिस रिपोर्ट व करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे त्यांना असणा-या अधिकाराचा वापर करून या कामावरील पी.एम.सी. "स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि." यांची सेवा रद्द करणेस मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार प्रशासनाने योग्य ती पुढील कार्यवाही करावी. तसेच अहमदनगर शहर पाणी पुवठा योजना फेज-२या कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग ) यांची नियुक्ती करणेस मान्यता देण्यांत येत आहे. कार्यारंभ आदेशानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कामकाज पहातील त्याचे देयक मा. शासनाने ठरविलेल्या दरानुसार अदा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ८**

विषय क्रमांक- ४२ शनिवार दिनांक १/९/२०१२

ठराव क्रमांक - ४२ शनिवार दिनांक १/९/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे नगर-मनमाड रोड वरील जकात नाक्याकरिता सावेडी सर्व्हे नं.२५०/१अ+२५०/१ब ही श्री.विलासराव बलभिमराव जगताप यांची खुली जागा दरमहा रूपये १,५०,०००/-प्रमाणे अकरा महिन्याकरिता भाडे कराराने घेणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. नगररचना विभाग जा.क्र. २१२४ दि.२२/८/२०१२

**टिप्पणी-**विषय-अहमदनगर महानगरपालिकेच्या नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्या करिता भाडेतत्वावरती खाजगी मालकीची खुली जागा कराराने घेणेबाबत.

सविनय सादर,

विनंती पुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की, नगर-मनमाड रोड येथे नागापुर स.नं. ६०/१/१ ही खुली जागा श्री. बाबासाहेब मारूती बोरकर यांच्याकडून जकात नाक्याकरिता भाडेतत्वावरती घेण्यात आली होती. सदर भाडेतत्वावरच्या प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्र.६७ दिनांक २७/१२/२०११ ने मंजुरी घेण्यात आली होती.

तथापि सदर जकात नाक्यावरती जकातीकरिता व पारगमनासाठी वाहने उभे राहिल्याने वाहतुकीचे प्रचंड कोंडी होत होती त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे नव नागापुर येथील ग्रामस्थ व परिसरातील नागरिकांनी सदर जकात नाका त्वरीत हलविणे बाबत आंदोलने केली होती. याच कारणामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये म्हणून जकात नाका दुस-या ठिकाणी हलवावा असे एम.आय.डी.सी. पोलिस स्टेशन चे पोलिस उपनिरीक्षक यांनी लेखी पत्र देवुन कळविले होते.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्यमान जकात नाक्याकरिता पर्यायी जागेची आवश्यकता असल्याने खुल्या जागेचा शोध घेतला असता सावेडी स.नं.२५०/१अ +२५०/१ब ही जागा श्री. विलासराव बलभीमराव जगताप यांच्या मालकीची असुन सदर जागा भाडेतत्वावर जकात नाक्यास देण्यास तयारी दर्शविलेली आहे. तसेच त्यांनी लेखी अर्ज व जागेचा ७/१२ उतारा अर्जासोबत जोडलेला आहे.

सदरची जागा जकात नाक्याकरिता भाडेतत्वावर घेण्याकरिता जागा मालक यांना सन २०१२-२०१३ चे शीघ्रगणकातील प्रचलीत बाजार दर मुल्याप्रमाणे भाडे दरमहा रू.१,८०,०००/- इतके होते. मा.आयुक्त यांचे अभिप्रायानुसार रूपये १,५०,०००/- दरमहा भाडे प्रमाणे सदरच्या जागेचा अकरा महिन्याचा भाडेकरारनामा करणेबाबतच्या मंजुरीबाबत निर्णयास्तव सादर.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-** नगर-मनमाड रोड वरील जकात नाक्याकरिता सावेडी येथील श्री.विलासराव बलभिमराव जगताप यांची खुली जागा दरमहा भाडे कराराने घेणेबाबत प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- अहमदनगर महानगरपालिकेच्या नगर-मनमाड रोडवरील जकात नाक्याकरीता घ्यावयाच्या खुल्या जागेचे भाडे आकारणी किती ठरविलेली आहे.

नगररचनाकार श्री.दहे :- नगर मनमाड रोडवरील सध्याच्या जकात नाक्याच्या जागे ऐवजी पर्यायी जागेकरीता पहाणी केली असता सावेडी सर्व्हे नंबर २५०/१ अ + २५०/१ ब ही जागा संबंधित जागा मालक श्री.विलास बलभिम जगताप यांच्या मालकीची असुन ते जकात नाक्यासाठी जागा देण्यास तयार आहेत. परंतु त्यांनी त्यांचे असणारे संपुर्ण क्षेत्र ४८२३.०५ चौरस मीटर जागा महानगरपालिका भाडे तत्वावर घेण्यास तयार असेल तरच देण्यात येईल अशी त्यांनी अट टाकलेली आहे. चालू सन २०१२-२०१३ च्या रेडीरेकनर दरानुसार पहिल्या ५०० चौरस मीटर करीता १०० टक्के दर पुढील १५०० चौरस मीटर करीता ९० टक्के दर पुढील २००० चौरस मीटर करीता ८० टक्के दर व उर्वरीत चौरस मीटर करीता ७० टक्के दर द्यावा लागेल. सदर जागेची मार्केट व्हॅल्यु २ कोटी ७१ लाख ७६ हजार येते सदर भाडे पट्टयासाठी या खुल्या जमिनीच्या एकुण किमतीच्या ८ टक्के इतके वार्षिक उत्पन्न गृहीत धरल्यास या जमिनीचे वार्षिक भाडे मुल्य २१,७४,११२/- इतके येईल. त्यामुळे या जागेस प्रतिमाह १,८१,१७६/- इतके भाडे येते. सदर भाडयाच्या रक्कमेत मा.आयुक्तांना १५टक्के कमी किंवा जास्त करण्याचे अधिकार आहेत.त्यानुसार मा.आयुक्त यांनी सदर रक्कमेत १५टक्के कमी करुन रक्कम रु.१,५०,०००/- दरमहा भाडे देणे बाबतचा विषय मा.स्थायी समितीपुढे पाठविलेला आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. व मा.सौ. खरमाळे सं.र. :- सदर भाडयामध्ये मा.आयुक्त सो यांनी कपात का केला वाढ का केली नाही.

उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे :- नगर-मनमाड रोडवरील जकात नाक्याकरीता घ्यावयाच्या जागेचे भाडे रक्कम रु.१,८१,०००/- मा.आयुक्त सो यांना जादा वाटले असल्याने त्यांनी त्यांच्या अधिकारात १५ टक्के कमी करुन रु.१,५०,०००/- भाडे देणे योग्य असल्या बाबत सुचविलेले आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- सदरचा विषय मंजूर करणेत यावा. तसेच सदर जागेबाबत मनपा विधीतज्ञांचा कायदेशिर अभिप्राय घेवुन पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा मात्र महानगरपालिकेचे जकात नाक्या करिता भाडे कराराने घ्यावयाच्या जागे प्रकरणी मनपा विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेउन पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

**<u>ठरावः-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे नगर-मनमाड रोड वरील जकात नाक्याकरिता सावेडी सर्व्हे नं.२५०/१अ+२५०/१ब ही श्री.विलासराव बलभिमराव जगताप यांची खुली जागा दरमहा रूपये १,५०,०००/-(रूपये एक लाख पन्नास हजार फक्त)प्रमाणे अकरा महिन्याकरिता भाडे कराराने घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र महानगरपालिकेचे जकात नाक्याकरिता भाडे कराराने घ्यावयाच्या जागे प्रकरणी मनपा विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेउन पुढील कार्यवाही करण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका